Maharashtra State
Board of Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board,
Servey No.1560/1, Adgaon Shivar,
Near New English School Adgaon,
Nashik-422 003.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,नाशिक विभागीय
मंडळ,सर्व्हे नं.१५६०/१,
आडगांव शिवार,न्यु इंग्लिश स्कुल
आडगांवजवळ,नाशिक–४२२००३.

दूरध्वनी क्रमांक 0253- 2950410,2945241,2945251 Email-nsksec@rediffmail.com

महत्वाचे/परीक्षा प्राधान्य

क्र.नाविमं/माध्य.ब १/6413
नाशिक ४२२००३
दिनांक १७/०२/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदुरबार

विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु–मार्च २०२३ करिता प्रविष्ठ होणा–या दिव्यांग विद्यार्थ्यांस सवलती देणेबाबत..

संदर्भ :– शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१७/(११८/१७)/एस.डी.६ दि.१६ ऑक्टोबर, २०१८

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु–मार्च २०२३ करिता प्रविष्ठ होणा–या दिव्यांग विद्यार्थ्यांस जादा वेळ सवलत तसेच लेखनिक मिळणेबाबत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत या विभागीय मंडळास प्रस्ताव प्राप्त होत असतात. त्यानुसार सदर विद्यार्थ्यांना जादा वेळ सवलत/लेखनिक देणेबाबत कार्यवाही करण्यात येते.

तसेच राज्यमंडळाने शासन निर्णयानुसार दिव्यांगाना सवलती देणेबाबत निकष ठरवून देण्यात आलेले आहेत. परंतु या कार्यालयाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, काही शाळा/कनिष्ठ महाविद्यालये शासन निर्णय तसेच राज्यमंडळ, पुणे यांनी ठरवून दिलेल्या निकषाव्यतिरिक्त कागदपत्रांची मागणी केली जाते. ज्यामुळे सदर दिव्यांग विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. तसेच काही दिव्यांग विद्यार्थी यामुळे सवलतीपासून वंचितही राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु–मार्च २०२३ करिता प्रविष्ठ होणा–या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ठ होताना कुठल्याही प्रकारचे अडथळे येणार नाही तसेच कुठलाही दिव्यांग विद्यार्थी दिव्यांगाना मिळणा–या सवलतीपासून वंचित राहणार नाही यासाठी त्यांना योग्य ते सहकार्य आपले स्तरावरून करण्यात यावे.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक ४२२ ००३

प्रत माहितीसाठी –
१. मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे
२. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) – नाशिक/धुळे/जळगांव/नंदुरबार